# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः26.08.2025** **वारःमंगळवार**

1. 'आपले सरकार'पोर्टलवरच्या सेवा व्हॉट्सॲपच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश
2. राज्यातल्या तीन शिक्षकांची राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारासाठी निवड
3. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतल्या 26 लाख लाभार्थ्यांची छाननी करण्याचे राज्य सरकारचे आदेश आणि
4. लाडक्या गणरायांच्या आगमनासाठी सर्वत्र जय्यत तयारी; प्रशासनही सज्ज

**मुख्यमंत्री-आपले सरकार**

आपले सरकार या पोर्टलवरील सर्व सेवा व्हॉट्सॲपच्या माध्यमातून पुरवण्यात याव्यात; तसंच सर्व सेवा योग्यप्रकारे आणि गरजेनुसार पुरवण्यासाठी सर्व तालुक्यांमध्ये यंत्रणा तयार करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. या संदर्भात काल मुंबईत झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एकाच प्रकारच्या नऊ सेवा एकत्र कराव्यात तसंच सेवा पुरवठ्याच्या गुणवत्तेची खात्री करण्यासाठी त्रयस्थ संस्थेमार्फत नियमितपणे पडताळणी करण्यात यावी अशी सूचनाही त्यांनी केली. निबंधक, भागीदारी संस्था, मुंबई कार्यालयाच्या 2.0 या उन्नत संकेतस्थळाचं उद्घाटनही काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं. या संकेतस्थळांमध्ये केलेल्या सुधारणांमुळे नागरिकांचा पैसा आणि श्रमाची बचत होईल असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

**व्हिजन डॉक्युमेंट मुख्यमंत्री**

2047 पर्यंत विकसित महाराष्ट्र करण्यासाठी अल्पकालीन, मध्यमकालीन आणि दीर्घकालीन उद्दिष्टांचा समावेश असलेलं व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्यात येत आहे. या व्हिजन डॉक्युमेंटमध्ये, जनसामान्यांच्या संकल्पनांचं प्रतिबिंब असावं, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. विकसित महाराष्ट्र 2047 व्हिजन डॉक्युमेंटच्या प्रारूप मसुदा सादरीकरण बैठकीत ते काल मुंबईत बोलत होते. या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, वित्त आणि नियोजन राज्यमंत्री आशिष जयस्वाल आदी उपस्थित होते. यासाठी जनतेच्या संकल्पना जाणून घेण्यात आल्या असून यामध्ये चार लाखापेक्षा जास्त नागरिकांनी आपला सहभाग नोंदवला आहे. विकसित महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी हा अत्यंत महत्त्वाचा दस्तऐवज म्हणून समोर येणार असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार-लातूर**

केंद्र सरकारनं राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारासाठी देशभरातून 152 शिक्षकांची निवड केली असून त्यामध्ये राज्यातल्या 3 शिक्षकांचा समावेश आहे. नांदेडचे डॉ. शेख मोहम्मद वकीउद्दीन शेख हमीदोद्दिन, लातूरचे डॉ. संदीपान जगदाळे आणि मुंबईतल्या सोनिया कपूर यांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे. डॉ. शेख नांदेडमधल्या अर्धापूर इथल्या जिल्हा परिषदेच्या शाळेत तर जगदाळे लातूरच्या दयानंद महाविद्यालयात शिकवतात. कपूर या मुंबईतल्या अणूऊर्जा महामंडळाच्या शाळेत शिक्षिका आहेत. येत्या 5 सप्टेंबर रोजी नवी दिल्लीत होणाऱ्या कार्यक्रमात त्यांना हा पुरस्कार प्रदान केला जाईल. लातूरच्या दयानंद कला महाविद्यालयातले संगीत विषयाचे प्राध्यापक डॉ. संदीपान जगदाळे यांनी पुरस्कार जाहीर झाल्यानंतर आकाशवाणीकडे प्रतिक्रिया व्यक्त केली.....

**मागील तेवीस वर्षांपासून दयानंद कला महाविद्यालय लातूर या ठिकाणी संगीत विषयाच्या अध्यापक म्हणून मी काम करतोय. खरं तर विद्यार्थी हे दैवत मानून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मग शैक्षणिक असेल, सामाजिक असेल, सांस्कृतिक असेल, सांगीतिक असेल किंबहुना राष्ट्रीय कार्यक्रम अशा विविध कार्यक्रमाचं आयोजन केलं आणि आज पाहत होतो एक सर्वोच्च पुरस्कार एका शिक्षकाच्या आयुष्यातल सगळ्यात मोठं स्वप्न असतं की एक राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार मिळावा आणि राष्ट्रपतींच्या हस्ते सन्मान या ठिकाणी माझा होतोय. खरं तर हे सगळं श्रेय जे आहे ते माझ्या विद्यार्थ्यांना माझ्या दयानंद शिक्षण संस्थेला या ठिकाणी मी समर्पित करतोय आणि येणाऱ्या काळामध्ये खूप साऱ्या राष्ट्रीय आणि सामाजिक शैक्षणिक सांगीतिक कार्यासाठी मला काम करायचं आहे. निश्चितच हा पुरस्कार मला प्रेरणा देणारा आहे.**

**मुख्यमंत्री-लाडकी बहिण**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेतल्या 26 लाख लाभार्थ्यांची छाननी करण्याचे आदेश राज्य सरकारनं जिल्हा पातळीवरच्या यंत्रणेला दिले आहेत. सर्व जिल्ह्यातले हे लाभार्थी अपात्र असल्याचं माहिती आणि तंत्रज्ञान विभागानं कळवलं आहे. त्यांची प्रत्यक्ष छाननी करण्याचे आदेश महिला बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी दिले आहेत. छाननीनंतर त्यांची पात्रता-अपात्रता ठरणार आहे. अपात्र लाभार्थ्यांवर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या निर्देशानुसार कारवाई केली जाईल, असं त्यांनी सांगितलं आहे.

**अजित पवार-कोल्हापूर**

पर्यावरणाच्या रक्षणासाठी एकेरी वापराच्या प्लॅस्टिकचा तसंच विविध कार्यालयांबरोबरच शासकीय, निमशासकीय कार्यालयांत प्लॅस्टिक बाटल्यांचा वापर पूर्णपणे थांबवण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. 100 दिवस प्लॅस्टिक बंदी अभियानाचा आरंभ त्यांच्या हस्ते काल कोल्हापूरमध्ये झाला; त्यावेळी ते बोलत होते. नागरिकांच्या आरोग्यासाठी जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी हा पुढाकार घेतला आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील प्रमुख विकास प्रकल्पांचा आढावाही काल अजित पवार यांनी घेतला. वाढती लोकसंख्या आणि हद्दवाढीचा विचार करून सर्व कामे गुणवत्तापूर्ण करावीत, असे निर्देश त्यांनी दिले. तसंच या विकास प्रकल्पांना आवश्यक निधीची कमतरता भासणार नाही, अशी ग्वाही देखील पवार यांनी दिली.

**गणेशोत्सव**

चौदा विद्या आणि चौशष्ठ कलांचा अधिपती असलेल्या सर्वांच्या लाडक्या गणपती बाप्पाचं उद्या भाद्रपद शुद्ध चतुर्थीला शुभमुहूर्तावर आगमन होत आहे. राज्यात सर्वत्र गणरायाच्या स्वागताची तयारी सुरू आहे. गणेशोत्सव हा महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख आहे. यंदा गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा मिळाल्यानं ही ओळख आता आणखी दृढ होणार आहे. सार्वजनिक गणेश मंडळ, त्याचबरोबर घराघरातही गणरायाच्या स्वागताच्या तयारीची लगबग पहायला मिळत आहे. आकर्षक गणेश मूर्ती, सजावट आणि विविधरंगी विद्युत रोषणाईचं साहित्य, पूजा साहित्य, फुलं, आणि विविध प्रकारच्या आकर्षक मखरांनी बाजारपेठा फुलून गेल्या आहेत. गणेश मंदिरांना आणि मंदिरातील मूर्तींना नवी झळाळी दिली जात आहे, सार्वजनिक गणेश मंडळांमध्ये पौराणिक, सामाजिक घटनांवर आधारित देखाव्यांची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. गणरायाच्या आगमनापासून ते विसर्जनापर्यंत उत्सव सुरळीत पार पाडण्यासाठी ठीकठिकाणचं स्थानिक प्रशासन, पोलीस यंत्रणा सज्ज झाल्या आहेत.

**कोकण रेल्वे**

दरम्यान गणेशोत्सवासाठी मुंबईतून कोकणात जाणाऱ्या नागरिकांसाठी विशेष रेल्वे सुरू करण्यात आली आहे. कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी काल छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस इथून या रेल्वेला हिरवा झेंडा दाखवून रवाना केलं.

**एसटी कर्मचारी पगार**

राज्य शासनाच्या इतर कर्मचाऱ्यांप्रमाणे एसटी महामंडळाच्या 83 हजार कर्मचारी आणि अधिकाऱ्यांचे ऑगस्ट महिन्याचे वेतन गणेशोत्सवापूर्वी देणार असल्याची माहिती परिवहन मंत्री आणि एस. टी. महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

यंदा गणपती उत्सव ऑगस्ट महिन्या अखेर आल्याने राज्य सरकारला एसटीच्या विविध सवलतीपोटीची प्रतिपुर्ती रक्कम लवकर देण्याची विनंती केली असल्याचं ते म्हणाले.

**श्रीचक्रधर स्वामी**

महानुभाव संप्रदायाचे संस्थापक भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी यांच्या जयंतीनिमित्त काल त्यांना राज्यात विविध ठिकाणी अभिवादन करण्यात आलं. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी राजभवन इथं चक्रधर स्वामींच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केलं.

**अमित साटम**

भारतीय जनता पक्षाच्या मुंबई अध्यक्षपदी आमदार अमित साटम यांची निवड करण्यात आली आहे. भाजपा कार्यालयात काल झालेल्या वार्ताहर परिषदेत मुख्यमंत्री आणि भाजपा नेते देवेंद्र फडणवीस यांनी ही घोषणा केली. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा आणि सर्व वरिष्ठ नेत्यांशी चर्चा केल्यानंतर मुंबईला नवा अध्यक्ष देण्याचा निर्णय झाला. त्यानुसार अमित साटम यांची निवड प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केल्याचं त्यांनी सांगितलं.

**मनोज जरांगे-जालना**

राज्यातल्या सर्व मराठा बांधवांनी काम-धंदे आणि व्यवसाय बंद ठेऊन मुंबईकडे निघावं, असं आवाहन मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी केलं. जालना जिल्ह्यातल्या अंतरवाली सराटी इथं ते काल पत्रकार परिषदेत बोलत होते. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी जरांगे उद्या आपल्या समर्थकांसह अंतरवाली सराटीतून मुंबईला जाणार आहेत.

**पूरग्रस्त भागाची पाहणी-यवतमाळ**

यवतमाळच्या महागाव आणि उमरखेड तालुक्यातील पूरग्रस्त शेती आणि बाधित गावांची पाहणी काल पालकमंत्री संजय राठोड यांनी केली. नुकसानीचे पंचनामे तात्काळ करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

**पाऊस-अहिल्यानगर, सोलापूर, धुळे**

अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रवरा नदीच्या पाणलोट क्षेत्रात होत असलेल्या सततच्या पावसामुळे भंडारदरा आणि निळवंडे धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. यामुळे नदीच्या पाणी पातळीत वाढ झाली असून, नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. धरणक्षेत्रात पाऊस असाच सुरू राहिल्यास विसर्गाचे प्रमाण आणखी वाढण्याची शक्यता आहे.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील इंगळगी, कणबस आणि शिरवळ परिसरात असलेल्या शिरवळ धुबधुबी प्रकल्पामध्ये गेल्या महिनाभरापासून उजनीचे पाणी सोडण्यात आले. त्यामुळे धुबधुबी प्रकल्प शंभर टक्के भरला आहे. काल संध्याकाळी धुबधुबी सांडव्याच्या ठिकाणी आमदार सुभाष देशमुख यांच्या हस्ते जलपूजन करण्यात आले. धुळे जिल्ह्यात काल दुपारी बहुतांश भागात पाऊस झाला. साक्री आणि शिरपूर तालुक्यात अनेक गावांत मध्यम स्वरूपात पाऊस झाला आहे.

**हवामान**

राज्याच्या सर्व विभागांमधे येत्या दोन तीन दिवसात कमी अधिक प्रमाणात पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. या काळात कोकणात बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची आहे. विदर्भ, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी, पाऊस पडण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडेल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार